# संक्षिप्त टिपणी

विषय - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत घेण्यात येणाऱ्या आदर्श प्रभाग संघ व्यवस्थापक पद परीक्षा बाबत-

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेमार्फत दिनांक 11 मार्च 2025 रोजी आदर्श प्रभाग संघ व्यवस्थापक या पदाची परीक्षा घेण्यात येणार आहे सदर पदाकरता दिनांक 05.09.2024 ते 19.09. 2024 या कालावधीत दैनिक पुढारी या वृत्तपत्रास जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आलेले होते सदर अर्जासाठी खालील प्रमाणे पात्रता व निकष आहेत.

1 अर्जदार महिला 'उमेद' स्वयंसहाय्यता समूहाची सदस्य असावी

2 कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे

3 वय किमान २२ वर्ष ते कमाल ४० वर्ष असावे.

4 'उमेद' अभियानांतर्गत गटाचा हिशोबनीस किंवा ग्रामसंघ/प्रभागसंघ लेखापाल किंवा समुदायस्तरीय लेखापरिक्षक किंवा प्रेरिका किंवा वर्धिनी किंवा वरिष्ठ वर्धिनी किंवा बँक सखी किंवा आर्थिक साक्षरता सखी किंवा पशु सखी किंवा कृषी सखी किंवा मत्स्य सखी किंवा वन सख्खी किंवा मास्टर कृषी सखी किंवा कृषी उद्योग सखी किंवा कृती संगम सखी/CTC किंवा कृषी व्यवस्थापक किंवा पशु व्यवस्थापक किंवा मत्स्य व्यवस्थापक किंवा BDSP किंवा FL CRP इ. ('उमेद' अंतर्गत सर्व प्रकारच्या समुदाय संसाधन व्यक्ती) म्हणून काम करण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.

5 उमेदवार ज्या प्रभागासाठी अर्ज करणार आहे त्या प्रभागातील मुळची रहिवासी असणे आवश्यक आहे.

6 स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणारी तसेच इंग्रजी, हिंदी भाषेमध्ये लिहिण्यास आणि वाचण्यास सक्षम असावी.

7 संगणकाचे ज्ञान असल्यास प्राधान्य देण्यात येईल. याकरिता संगणक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे

8 उत्तम सुसंवादी, नेतृत्व गुण असलेली व गरीब कुटुंबाच्या प्रश्नावर संवेदनशीलतेने काम करणारी असावी

9 प्रभागसंघाचे कार्यकारी समिती सदस्य (EC), पदाधिकारी (OB) यांच्या कुटुंबातील नसावी.

10 स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (PRI) सदस्य नसावी.

11 अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती म्हणून कार्यरत नसावी. कोणत्याही शासकीय संस्था/स्वयंसेवी संस्था (NGO) मध्ये सेवा देणारी तसेच स्था.स्व.सं.सदस्य/स्था.स्व.सं. पदाधिकारी इ. म्हणून कार्यरत नसावी.

12 स्वतःचे गाव सोडून नेमून दिलेल्या प्रभागातील गावांमध्ये प्रवास करून क्षेत्रकार्य करण्याची तसेच बाहेर गावी प्रशिक्षण/कार्यशाळा इ. करिता उपस्थित राहण्याची तयारी असणे आवश्यक आहे.

13 ज्या गट व ग्रामसंघाची सदस्य आहे, तो गट व ग्रामसंघ A किंवा B श्रेणीतील असणे आवश्यक आहे.

14 वंचित कुटुंबांतील सदस्य, विधवा, परितक्त्या, अ.जा., अ.ज., दिव्यांग, आदिम जाती/जमाती, एसइबीसी इ. प्रवर्गातील असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

प्रभागसंघ व्यवस्थापकाच्या जबाबदाऱ्या -

1 उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अर्थसंकल्पीय खर्च, माहिती व्यवस्थापित करणे, अहवाल तयार करणे, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, सरकारी विभाग, व्यवस्थापकीय कर्मचारी आणि प्रभागसंघाच्या सुरळीत कामकाजासाठी अहवाल देणे.

2 यशोगाथा, अचूक अहवाल लेखन आणि दस्तऐवजीकरण करणे.

3 प्रभागसंघाची कार्ये पार पाडण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकारी समिती सदस्य यांना सहकार्य करणे.

4 प्रभागसंघ आणि प्रभागसंघ सदस्यांना अभियानाच्या विविध विषयांची आणि इतर उपक्रमासंबंधित माहिती सादर करणे.

5 कम्युनिटी केडरचे प्रशिक्षण, कामकाज देखरेख, मानधन व एकूण व्यवस्थापनाचे काम करणे,

6 प्रभागसंघ लेखापाल, एमआयएस असिस्टंट, सुलभकर्ते आणि इतर प्रभागसंघस्तरीय कर्मचाऱ्यांच्या कामाचे व्यवस्थापन व सनियंत्रण करणे.

7 प्रभागसंघाने सोपवलेली अन्य कामे करणे.

8 देयक अदा करण्यापूर्वी सर्व देयकांची पडताळणी करून साक्षांकित/स्वाक्षरी करणे,

9 प्रभागसंघाच्या सक्षमीकरणासाठी धोरणे आणि दिशा ठरवणे.
इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या आहेत.

लेखी परीक्षा -

| प्रश्नाचे स्वरूप | मराठी व्याकरण | संगणक ज्ञान | गणित | सामान्य ज्ञान | बुद्धिमत्ता चाचणी | अभियान संबंधित | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुण | 5 | 5 | 10 | 10 | 15 | 30 | 75 |

**मुलाखत – 25** गुण

| शिक्षण | अभियानाचा अनुभव | विषय ज्ञान | व्यक्तिमत्व | संवाद कौशल्य व निर्णय क्षमता | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| 13 गुण | 7 गुण | 2 गुण | 1 गुण | 2 गुण | 25 गुण |

अशा सूचना प्राप्त आहेत.

2024 - 25 या वर्षांमध्ये 12 तालुक्यातील 12 आदर्श प्रभाग संघांमध्ये पद भरती करण्यात येणार आहे यामध्ये 63 उमेदवार पात्र झाले असून त्यांची लेखी परीक्षा व मुलाखत घेण्यात येणार आहे.

**A.परीक्षा उपकेंद्रावरील उपस्थितीबाबत :-**

1 **मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. प्रवेशपत्रा वर नमून केलेल्या ठिकाणी उमेदवाराने अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट फोटो चिटकवून त्यावर राजपत्रित अधिकारी किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडून साक्षांकन करून घेणेचा आहे. अन्यथा परीक्षेस प्रवेश नाकारला जाईल.**

2 **परीक्षा उपकेंद्रावरील उपस्थितीकरीता निर्धारित केलेल्या वेळेस उपस्थित राहून उपस्थिती नोंदविणे अनिवार्य आहे.**

3 **उमेदवारांची तपासणी / झडती (Frisking), ओळख पडताळणी करणे, हजेरी नोंदविणे, सूचना देणे इत्यादी स्वरुपाच्या कार्यवाहीसाठी परीक्षा उपकेंद्रावर प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान एक तास अगोदर उपस्थित राहणे अनिवार्य आहे.**

4

परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उदभवू शकणाऱ्या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इ.बाबी लक्षात घेऊन, विहित वेळेच्या पुरेसे अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

5 परीक्षा कक्षामध्ये शेवटच्या प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात जिल्हा परिषद कोल्हापूर कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

6 परीक्षा उपकेंद्राच्या आवारामध्ये मित्र, नातेवाईक, पालक अथवा अन्य अनाधिकृत कोणत्याही परिस्थितीत प्रवेश अनुज्ञेय नाही

7 परीक्षेवेळी मद्य आणि / किंवा मादक अमली पदार्थांचे प्राशन केलेले आढळल्यास उमेदवारांवर उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, अशा उमेदवारांवर जिल्हा परिषद कोल्हापूर स्वेच्छाधिकारानुसार जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत आयोजित सर्व परीक्षा निवडीकरिता प्रतिरोधित करण्यात येईल.

8 पडताळणी / तपासणी संदर्भातील कार्यवाही झाल्यानंतर स्वतःच्या बैठक क्रमांकावर जाऊन बसणे अनिवार्य आहे.

B. ओळखीच्या पुराव्याबाबत:-

परीक्षेच्या वेळी ओळखीच्या पुराव्यासाठी खालीलपैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र सादर करणे अनिवार्य आहे:-

1 (१) आधारकार्ड,(२) निवडणूक आयोगाचे ओळखपत्र,(३) पासपोर्ट (४) पॅनकार्ड (५) स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स

2 परीक्षेच्या वेळी प्रवेश प्रमाणपत्र आणि वर नमूद पाच वैध (Valid) ओळखपत्रांपैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची सुस्पष्ट छायांकित प्रत सादर न केल्यास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल.

3 मूळ ओळखपत्राच्या पुराव्याऐवजी केवळ त्याच्या छायांकित प्रती अथवा कलर झेरॉक्स अ अन्य कोणत्याही प्रकारचा ओळखीचा पुरावा सादर केल्यास तो ग्राहय धरला जाणार नाही उमेदवारास परीक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल.

4 उमेदवाराचे छायाचित्र व इतर मजकूर सुस्पष्टपणे दिसेल अशी मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत्येक पेपरच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

5 भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक

(Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह रंगीत प्रिंट मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

6 नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहीत स्त्रियांच्या बाबतीत), नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिव यांच्याकडून नावात बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्या वेळी स करणे आवश्यक आहे.

C. सोबत आणण्यास / बाळगण्यास परवानगी असलेले साहित्य:-

1 परीक्षा कक्षामध्ये फक्त खालील साहित्य घेऊन जाण्यास परवानगी राहील:-
(१) जिल्हा परिषद कोल्हापूरच्या सुस्पष्ट स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र,
(२) काळ्या शाईचे बॉल पॉईंट पेन
(३) मूळ वैध ओळखपत्र, (४) मूळ वैध ओळखपत्राची सुस्पष्ट छायांकित प्रत

2 परवानगी नसलेले अन्य कोणतेही साहित्य (पाऊच, पर्स, बॅग्ज, नोट्स, पुस्तक, लेखन इत्यादी)परीक्षा कक्षामध्ये नेण्यास सक्त मनाई आहे.

3 स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल दूरध्वनी, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, परिगणक (Calculator) इत्यादी परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे.

4 जिल्हा परिषद कोल्हापूरने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन / साहित्य परीक्षेच्या वेळी संबंधित परीक्षा उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन / साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस जिल्हा परिषद कोल्हापूर, जिल्हा प्रशासन किंवा शाळा / महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

D . कार्बनलेस उत्तरपत्रिकांच्या वापराबाबत उमेदवारांना विशेष सूचना :-

1 उत्तरपत्रिकेवरील माहिती भरण्यासाठी व योग्य उत्तराचे वर्तुळ छायांकित करण्याकरिता फक्त काळया शाईचे बॉल पॉईंट पेन वापरावे. हे करतांना दुय्यम प्रतीवरही स्पष्ट खूण दिसण्यासाठी पुरेसा दाब द्यावा.

2 उत्तरपत्रिकेवरील मजकुरामध्ये बदल करण्यासाठी White Fluid, Blade अथवा तत्सम साधनांचा कोणत्याही परिस्थितीत वापर करु नये.

3 परीक्षा कालावधीतच उत्तरपत्रिकेवर परीक्षेचे नांव, बैठक क्रमांक (Roll Number), प्रश्नपत्रिका क्रमांक, संच क्रमांक, प्रवेश प्रमाणपत्रावर नमूद केलेला विषयाचा संकेतांक (Subject Code) योग्य ठिकाणी इंग्रजीमध्ये व अचूकपणे नमूद करुन विहित ठिकाणी स्वाक्षरी करावी.

4 उत्तरपत्रिकेवर स्वतः चे नांव अथवा स्वतःची ओळख पटेल असा कोणताही तपशील नमूद करुनये.

5 प्रश्नपुस्तिकेत विहित केलेल्या जागीच कच्चे काम करावे. उत्तरपत्रिकेवर अथवा अन्य ठिकाणी कच्चे काम अथवा अन्य कोणताही तपशील नमूद करु नये.

6 प्रश्न क्रमांकासमोर दिलेल्या चार पर्यायांपैकी निवडलेल्या उत्तराचे वर्तुळच उत्तरपत्रिकेवर पुढील 'योग्य" मध्ये दर्शविलेल्या पध्दतीप्रमाणे छायांकित करावेः




7 उत्तरपत्रिकेवर प्रश्नांच्या उत्तराचे संबंधित वर्तुळ आवश्यक दाब देवून छायांकित करावे जेणेकरुन त्याचा छाप (Impression) उत्तरपत्रिकेच्या कार्बनलेस प्रतीवर (भाग-२) वर व्यवस्थित उमटेल याबाबत आत्यंत्तिक दक्षता घेण्यात यावी.

8 प्रश्नाचे उत्तर नमूद करण्याकरीता प्रत्येक प्रश्नाकरीता प्रत्येकी एकच वर्तुळ छायांकित करावे. एकापेक्षा अधिक वर्तुळे छायांकित केल्यास अथवा तसा कोणत्याही प्रकारे प्रयत्न केल्यास अशा प्रश्नांच्या उत्तरास चुकीचे उत्तर समजण्यात येईल.

9 एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने नमूद केल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केल्यास, त्या प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येईल.

10 उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या बरोबर उत्तरांनाच गुण दिले जातात. उमेदवारांने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत

11 **प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दती लागू असणार नाही**

12 **उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर नमूद केलेल्या प्रश्नपुस्तिकेच्या संच क्रमांकानुसारच उत्तरपत्रिकांचे संगणक संस्करण केले जाते. संच क्रमांक चुकीचा लिहिल्यास अथवा नमूद केलेल्या संच क्रमांकामध्ये तफावत आढळून आल्यास त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. परीक्षेनंतर यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.**

13 **परीक्षेचा कालावधी संपेपर्यंत उत्तरपत्रिकेचा भाग-२ मूळ उत्तरपत्रिकेपासून कोणत्याही परिस्थितीत वेगळा करु नये, अथवा उघडण्याचा प्रयत्न करु नये.**

14 **परीक्षेनंतर मूळ उत्तरपत्रिका (भाग-१) समवेक्षकाकडे जमा करताना ती भाग-२ पासून विहित ठिकाणी (Perforation mark वर) व्यवस्थितरित्या फाडून, वेगळी करावी.**

15 **मूळ उत्तरपत्रिकेपासून भाग-२ वेगळा करताना मूळ उत्तरपत्रिका फाटणार नाही, अथवा चुरगळ नाही, याची आत्यंतिक दक्षता घ्यावी.**

16 **परीक्षेनंतर मूळ प्रवेशपत्र, उत्तरपत्रिकेचा भाग-१ व प्रश्नपत्रिका समवेक्षकाकडे जमा करावी.**

17 **उमेदवारांकडील उत्तरपत्रिकेचा भाग-२ हा सुध्दा महत्वाचा दस्तऐवज असल्याने तो व्यवस्थित सुरक्षितपणे निवडप्रक्रियेचा अंतीम निकाल लागेपर्यंत जतन करावा.**

18 **परीक्षेनंतर उमेदवारांकडील भाग-२ वर कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही प्रकारचा बदल अ खाडाखोड करु नये.**

19 **सदर उत्तरपत्रिका ही जिल्हा परिषद कोल्हापूरची मालमत्ता असून ती, कोणत्याही प्रकारे अनधिकृतपणे हाताळण्याची अथवा जवळ बाळगण्याची कोणत्याही व्यक्तीला परवानगी न अशी कृती अनधिकृत व बेकायदेशीर समजण्यात येते.**

20 **एखादया उमेदवारास प्रवेशपत्र न मिळल्यास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद कोल्हापूर विभाग किवा परीक्षा'केंद्रावर प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे.**

21 **लेखी परीक्षेतील गुण व मुलाखती करिता पात्र उमेदवार यांची यादी जिल्हा परिषद कोल्हापूरच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल, याबाबत वेगळ्याने उमेदवार यांना कळविण्यात येणार नाही.**

सदर परीक्षेसाठी खालील प्रमाणे परीक्षा वेळापत्रक असणार आहे .

| अ.क्र. | दिनांक | वेळ | तपशील |
|---|---|---|---|
| 1 | 11 मार्च 2025 | 11.00 ते 1.00 | परीक्षा वेळ |
| 2 | 11 मार्च 2025 | 04 .00 वाजेपर्यंत | प्रारूप उत्तर पत्रिका www.zpkolhapur.gov.in वर प्रसिद्ध करणे |
| 3 | 12 मार्च 2025 | सकाळी 12.00 वाजेपर्यंत | प्रारूप उत्तर पत्रिकेवरती हरकती मागविणे |
| 4 | 12 मार्च 2025 | 12 मार्च रोजी संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत | उत्तर पत्रिकेवरती हरकती मागावने व आलेल्या हरकतीवर निर्णय घेऊन अंतिम उत्तर पत्रिका करणे |
| 5 | 13 मार्च 2025 | 11. 00 ते 1.00 | उत्तर पत्रिका तपासणी |
| 6 | 13 मार्च 2025 | 2.00 वाजेपर्यंत www.zpkolhapur.gov.in वर प्रसिद्ध करणे | रिझल्ट लावणे |
| 7 | 17 मार्च रोजी | सकाळी 11.00 वाजता | मुलाखती घेणे |
| 8 | 17 मार्च2025 | मुलाखती नंतर | अंतिम निवड यादी प्रसिद्ध करणे |

सदर परीक्षा दि.11/03/2025 रोजी सकाळी 1100 ते 1.00 या वेळेत तंत्रज्ञान अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी होणार आहे. संबधित परीक्षेकरिता

उमेदवाराने परीक्षा केंद्रावर परीक्षेपूर्वी 1 तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. सदर परीक्षेकरिता उमेदवाराना पोष्टाद्वारे प्रवेशपत्र पाठवले जाणार आहे काही अपरिहार्य कारणास्तव एखाद्या उमेदवारास प्रवेशपत्र न मिळाल्यास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद कोल्हापूर विभाग किंवा परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले जाणार आहे. उमेदवाराने परीक्षेला येताना ओळखीचा पुरावा म्हणून आधारकार्ड, PANCARD / Driving Licence /पासपोर्ट/ निवडणूक ओळखपत्र सोबत आणणे बंधनकारक राहील. सदरची परीक्षा हि बहुपर्यायी स्वरुपाची असणार आहे. सदर परीक्षा वेळापत्रक हे जिल्हा परिषद कडीत www.zpkolhapur.gov.in या संकेतस्थळावरती प्रसिद्ध केले जाणार आहे.

टीप:- परीक्षा संदर्भातील कोणत्याही स्तरावर अडचणी बाबतीत खालील संपर्क क्रमाकावर संपर्क साधण्यात यावा. 0231-2655598, 9890612510